श्री रामसमर्थ

# श्री समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे

रामवाडी, धुळे, ४२४००१दूरध्वनी क्र. ०२५६२ २३६२८७

::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::

::::::::::::: :रामकथा ब्रह्माण्ड भेदुनि पैलाड न्यावी

प्रा. दे. दि. डोंगरे
कार्याध्यक्ष
९८९०२४६७११

शरद कुबेर
अध्यक्ष
९८९०५२३६९

---

आदिनारायणं विष्णुं ब्रह्माणं च वसिष्ठकं । श्रीरामं मारुतीं वन्दे रामदासं च श्रीधरं ।।
नमः शान्ताय दिव्याय सत्यधर्मस्वरुपिणे । स्वानन्दामृत तृप्ताय श्रीधराय नमो नमः ।।

**अहो भाग्यम् '**

अशी अनुभूती देणारी, श्री समर्थ रामदास स्वामींनी टाकळी येथे तपश्चर्येच्या काळांत वयाच्या १४ व्या वर्षी स्वहस्ते ही सम्पूर्ण ७ कांडांची, १७२० पृष्ठांची संस्कृत पोथी लिहिली.. , श्रीवाल्मीकि रामायणाची, संपूर्ण प्रत श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरात आहे. ४००, वर्षापूर्वीची, एकहाती, सुंदर अक्षरात, नेटकेपणाने लिहिलेली ही एकमेव प्रत असेल.

रामेण रामदासेन लिखितम वाल्मीकि रामायणम ही पोथी
श्रीसमर्थ वाग्देवता मंदिराची अधिष्ठात्री देवता आहे

या प्रतीचा अभ्यास, संशोधन व प्रकाशन प्रकल्प गेली ३ वर्षे चालू आहे. आतां बालकाण्ड प्रकाशनास सिध्द असून पुढील ७ खंड आगामी ३-४ वर्षात पूर्ण होतील. सर्व खंड प्रकाशित झाल्यावर अनेक पिढयांना संशोधनासाठी पुरेल अशी शिदोरी यातून मिळेल, समर्थभक्तांना तर श्रीसमर्थांच्या हस्ताक्षरातील रामायण लाभणार असल्याने त्यांचा आनंद वर्णनातीतच असेल.

श्रीसमर्थभक्तांचे केवळ दुर्लभ भाग्य म्हणूनच समर्थहृदय देवांना लाभलेली प्रत -देवांनी प्राणपणाने जपून - श्रीसमर्थवाग्देवता मंदीरात अधिष्ठात्री देवतेचा मान देऊन - ठेवली. ही प्रत आर्थिक अडचणीबरोबरच -वृध्दत्वामुळे -छापण्याचे भाग्य त्यांना लाभले नाही. नाहीतर एव्हाना हे रामायण जगन्मान्य झाले असते. श्री समर्थांच्याच प्रेरणेने, प.पू. भगवान श्रीश्रीधर्रस्वामिंच्या कृपाशिर्वादाने, देवांचे कार्य, संशोधनाच्या सर्व कसोटयावर उतरेल अशा, शास्त्रीय पध्दतीने, संस्थेने हाती घेतले आहे. या महत्वाकांक्षी प्रकल्पाची आपणास कल्पना आहेच.

आतां सर्व सांप्रदायिकांनी, श्रीसमर्थांच्या अभिमानी व्यक्ति व संस्थांनी आणि संस्कृत व संस्कृतिच्या सहाय्यभूत समूहाने या कार्याला सर्वतोपरी सहकार्य करणे अतिशय आवश्यक आहे.

आपणाकडून यासाठी उदार अर्थसहाय्य लाभावे आपणास श्रीसमर्थसेवेचा लाभ घडावा म्हणुन हे निवेदन केले आहे. ˎ

आपण व आपली संस्था श्रीसमर्थांचे मूळ साहित्य प्रकाशित व्हावे यासाठी आस्था बाळगणारे आहात. एखादा तत्पर दानशूर कदाचित एकहाती ह्या प्रकल्पाचे प्रायोजकत्व स्विकारून श्रीसमर्थ सेवा कार्यात मुगुटमौली-रत्नवत् साह्य करू शकेलहि.. तथापि कोणीहि यथाशक्ति साहयभूत व्हावे अशी आम्ही श्रीसमर्थांना प्रार्थना करून आपणास विनंती करीत आहोत.
ही श्रीसमर्थाची भिक्षा आहे.आपण या समर्थसेवेसाठी **जे जे अनुकूळ । ते ते करावे तत्काळ ।।**

*या संस्थेस दिलेले अर्थ साह्य आयकर सवलतीच्या ८० जी कलमानुसार सवलतीस मान्य आहे.*

या पवित्र उपक्रमासाठी आपण असे योगदान देऊ शकता :

₹ ५.00 लक्ष वा अधिक रक्कम देउन आधारस्तंभ होणे. ( हा एका काण्डाचा अंदाजे फक्त प्रकाशन खर्च आहे)

₹ १.00 लक्ष वा अधिक रक्कम देउन आश्रयदाते होणे. ( हा एका काण्डाचा प्रत्यक्ष संशोधन खर्च आहे)

₹१५,000 /- वा अधिक रक्कम देउन संच दाते होणे. ( हा आठ खंडाच्या एका संचाचा अंदाजे प्रकाशन खर्च आहे)

₹ २,५00 /- वा अधिक रक्कम देउन ग्रंथ दाते होणे. ( हा एका ग्रंथाचा अंदाजे प्रकाशन खर्च आहे)

दिलेली देणगी आयकर सवलतीस ८०-ग अन्वये सवलतीस पात्र आहे. देणगी थेट बॅंकेत भरु शकता.

बचत खाते **SHRI SAMARTHA VAGDEVTA MANDIR**
**BANK OF BARODA, RAMWADI Br. DHULE**
A/C NO. **18740100010355** RTGS **BARBORAMDHU 2940**

देणगीदारांचा यथोचित आणि गौरवान्वित उल्लेख केला जाईल.
आपल्या अनुकूल प्रतिसादाची अपेक्षा आहे.
शेष श्रीसमर्थ कृपा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| डॉ. वि.आ. चितळे | प्रा.नकाणेकर | श्री.नगरदेवळेकर | प्रा.डोंगरे | स.भ. कुबेर |
| अध्यक्ष | चिटणीस | उपाध्यक्ष | कार्याध्यक्ष | अध्यक्ष |
| सत्कार्योत्तेजक सभा | | | श्री समर्थवाग्देवता मंदीर | |